# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक :- १५०-२२** **दिनांक :- २७/०५/२०२२**

## मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस पथकाने झेक रिपब्लिक या देशातून खुनाच्या गुन्हयातील आरोपी केला अटक.

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील काशिमिरा पोलीस ठाणे येथे I गुरनं २१/२००३ भादंवि कलम ३०२, २०१, १२० (अ), ४०४ प्रमाणे दिनांक ०८/०२/२००३ रोजी दाखल आहे. सदर गुन्हयातील आरोपी नामे प्रग्नेश महेंद्रकुमार देसाई मुळ रा. बडोदा, गुजरात हा त्याची पत्नी नामे सौ. तृप्ती, मुले, आई व बहिणीसह अमेरिकेचे नागरिकत्व घेवून तेथे राहत होता. आरोपी प्रग्नेश देसाई याचे कु. लिओना जी. स्वीडेस्की वय-३३ मुळ रा. अमेरिका हिचेशी प्रेमसंबंध जुळल्याने त्याचे पत्नीने त्याचेपासून नोव्हे. २००३ मध्ये घटस्फोट घेवून मुलांसह विभक्त राहत होती.

दिनांक ०४.०१.२००३ ते दिनांक १६.०१.२००३ या कालावधीत आरोपी प्रग्नेश देसाई हा त्याची अमेरिकन प्रेयसी कु. लिओना स्वीडेस्को हिचेसह भारतात बडोदा येथे राहण्यास आला असता आरोपी प्रग्नेश देसाई यास त्याच्या अमेरिकेतील मित्राने फोन करुन सांगितले की, त्याची प्रेयसी लिओना स्वीडेस्को हिने त्याची घटस्फोटीत पत्नी तृप्ती हिस ठार मारण्यासाठी अमेरिकेतील माफियांना २० हजार डॉलर्सची सुपारी दिलेली असून त्यापैकी १० हजार डॉलर्स माफियांना ॲडव्हान्स स्वरुपात दिलेले आहेत, अशी माहिती दिली. त्यामुळे आरोपी प्रग्नेश देसाई याने बडोदा राज्य गुजरात येथील विपुल मनुभाई पटेल यास त्याची प्रेयसी नामे कु. लिओना जी. स्वीडेस्की हिला ठार मारण्यासाठी ३० लाख रुपयांची सुपारी दिली होती. त्यानंतर दिनांक ८/२/२००३ रोजी आरोपी प्रग्नेश देसाई हा त्याची प्रेयसी नामे कु. लिओना जी. स्वीडेस्की हिस लग्न करण्याच्या बहाण्याने परत भारतामध्ये घेवून आला असतांना आरोपी विपुल पटेल हा देखील कारने त्याचे इतर साथीदार नामे अल्ताफ गफुर पटेल व फारुख बनारसी रा. सुरत, गुजरात यांना घेवुन सहार आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई येथे घेवून आला होता.

दिनांक ८/२/२००३ रोजी सकाळी ०३.३० वाजताचे सुमारास प्रग्नेश देसाई व त्याची प्रेयसी नामे कु. लिओना जी. स्वीडेस्की हे दोघे अमेरिकेहून आल्यानंतर आरोपी विपुल पटेल व त्याचे साथीदारांनी प्रग्नेश देसाई व लिओना जी. स्वीडेस्की यांना त्याचे कारमध्ये बसविले. त्यावेळी आरोपीतांनी संगणमत करुन गाडीमध्ये बसलेल्या लिओना हिचा गळा दाबून तिला ठार मारले व पुरावा नष्ट करण्याचे इरादयाने तीचा मृतदेह मुंबई-अहमदाबाद राष्टीय महामार्गावर वरसार्वे गावाचे हद्दीत फेकुन दिला होता. सदर गुन्हयाचे तपासादरम्यान यातील आरोपी नामे १) प्रग्नेश महेंद्रकुमार देसाई रा. ६४५, पॅलीसेड एव्हन्यु, क्लिप साईट

पार्क, न्यु जर्सी, अमेरीका २) विपुल मनुभाई पटेल रा.बंगला क्र.९, तुलसी, श्रीजी श्रध्दा सोसायटी, कारेलोबाग, बडोदा, राज्य गुजरात यांना अटक करण्यात आली होती. सदर गुन्हयाचे तपासाअंती मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, ठाणे येथील न्यायालयात २००३ मध्ये दोषारोपपत्र सादर करण्यात आले होते व त्यानंतर आरोपी नामे अल्ताफ गफुर पटेल व फारुख बनारसी रा. सुरत, गुजरात यांनादेखील अटक करुन पुरवणी दोषारोपपत्र सादर करण्यात आले होते. सदर गुन्हयाचा २००४ मध्ये निकाल लागून यातील आरोपीतांची निर्दोष मुक्तता झाल्याने त्याविरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दिनांक ०४.१०.२००४ रोजी सरकारतर्फे परत अपील करण्यात आले होते.

गुन्हयातील दोन्ही आरोपी नामे प्रग्नेश देसाई व विपुल पटेल हे मा. न्यायालयाच्या सुनावणीवेळी हजर राहत नसल्याने त्यांचेविरुध्द नॉन बेलेबल वॉरन्ट काढण्यात आले होते. आरोपी प्रग्नेश महेंद्रकुमार देसाई, वय-३९ वर्षे हा बडोदा, राज्य गुजरात या पत्त्यावर मिळुन आल्याने त्यास दिनांक ०९.०३.२०२१ रोजी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे हजर केले असता त्यास मा. न्यायालयाने जामीनावर मुक्त केलेले आहे. मात्र आरोपी विपुल मनुभाई पटेल हा युरोपमध्ये राहण्यास गेला असल्याने त्याचे मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी स्टॅण्डींग नॉन बेलेबल वॉरंट काढले होते. त्याअनुषंगाने आरोपी विपुल मनुभाई पटेल याची रेड कॉर्नर नोटीस सी. आय. डी. पुणे यांचे मार्फतीने सी.बी.आय.(इंटरपोल) न्यु दिल्ली यांना सादर करण्यात आली होती. त्यानंतर सदरील रेड कॉर्नर नोटीस नुसार आरोपी विपुल मनुभाई पटेल यास एन.सी.बी. प्राग, झेक रिपब्लीक येथे दिनांक २६.११.२०२१ रोजी अटक केली होती. त्यामुळे आरोपी विपुल मनुभाई पटेल यास ताब्यात घेणेकामी प्रत्यार्पण प्रक्रिया पुर्ण करुन मा. श्री. सदानंद दाते, पोलीस आयुक्त, श्री. श्रीकांत पाठक, अप्पर पोलीस आयुक्त, मि.भा.व.वि.आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली श्री अमित काळे, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ ०१, काशिमिरा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. संजय हजारे, पोलीस निरीक्षक श्री. प्रमोद बडाख, सपोनि. योगेश काळे यांचे पथक झेक रिपब्लीक येथे पाठविण्यात आले होते. सदर पथकाने म्युनिसिपल कोर्ट, झेक रिपब्लीक या न्यायालयाचे आदेशाने एन.सी.बी. प्राग झेक रिपब्लीक येथुन आरोपी विपुल मनुभाई पटेल यास ताब्यात घेवुन दिनांक २७.०५.२०२२ रोजी काशिमिरा पोलीस ठाणे येथे आणले असून त्यास उदईक दि २८/५/२०२२ रोजी मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, ०८ वे कोर्ट, ठाणे येथे हजर करण्यात येणार आहे.

खुनासारख्या गंभीर गुन्हयातील आरोपीस युरोपीय देशातून ताब्यात घेण्याकरिता प्रत्यार्पणाची महत्वपुर्ण व क्लिष्ट प्रक्रिया यशस्वीपणे पुर्ण करण्यात मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीसांना यश आले आहे. सदर प्रत्यार्पणाच्या प्रक्रियेमध्ये सी. आय. डी. पुणे, सी.बी.आय. नवी दिल्ली, मिनिस्ट्री ऑफ एक्टर्नल अफेअर्स, भारत सरकार, नवी दिल्ली तसेच प्राग, कतार व भारतीय एंम्बेसी विभागाची महत्वपुर्ण मदत मिळाली आहे.